


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# मेळघाटातील आदिवासीं जमातीचे सामाजिक जीवन

**नितीन के. देशमुख**
इंग्रजी विभाग प्रमुख,
श्री वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणी.

**प्रस्तावना:**

शतकानुशतके उपेक्षित राहलेल्या जंगल, दऱ्याखोऱ्यासारख्या डोंगराळ व दुर्गम भागात राहत असलेल्या आदिवासी जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आरोग्य, शैक्षणिक आर्थिक जीवन समजून घेणे आजच्या सभ्य संस्कृतीची गरज आहे. मेळघाटातील आदिवासी अतिदुर्गम व डोंगराळ, जंगली भागात राहत असल्यामुळे आज ही बहुसंख्य आदिवासी परंपरागत पद्धतीने जीवन जगत आहेत. प्रगत समाजापासून वर्षानुवर्षे अलिप्त राहत असल्यामुळे देवधर्म, पुजापाठ, जादुटोणा व विविध प्रकारचे चमत्काराविषयी त्यांच्या मनात असलेली श्रद्धा खोलवर रूजल्या गेली आहे. 'एकविसाव्या शतकात आपला भारत देश तांत्रिकदृष्ट्या प्रगतीकडे वाटचाल करते आहे. परंतु सामाजिकदृष्ट्या मात्र भारतातील विविध जाती-जमाती विशेषतः आदिवासी जमाती आज ही त्यांच्या मूलभूत हक्कासाठी झगडत आहे." आजही आदिवासी समाज सामाजिक, आर्थिक, राजकीय, आरोग्य आणि शैक्षणिकदृष्ट्य मागासलेला आहे. या परिस्थितीला मेळघाटातील आदिवासी जनजीवन अपवाद नाही. 'भारताचे नागरिक या नात्याने आदिवासी जमातीला इतरांच्या प्रमाणात समान नागरी, राजकीय व सामाजिक हक्क प्रदान करण्यात आले. त्यांचे नागरी व राजकीय हक्क भारतीय घटनेतील भूलभूत हक्काच्या कार्यकक्षेत जतन आहे." परंतु काय खरच ! मेळघाटातील आदिवासींना त्याचे मूलभूत अधिकार मिळाले आहे.' आजही मेळघाटातील बहुसंख्या आदिवासींची कोरकू जमात मध्यप्रदेशातील नेमाड जिल्ह्यात तसेच विदर्भातील अमरावती जिल्ह्यात आढळून येते. अमरावती जिल्ह्यातील सातपुडा पर्वतांच्या परिसरात कोरकू ही आदिवासी जमात राहते. कोरकू लोक हे उंचीने ठेंगू, रंगाने काळे, बांध्याने काटक असे आहेत. कोरकू लोकांच्या

शारीरिक लक्षणांच्या आधारे हे लोक द्रविड वंशाचे आहेत असे मत अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. रसेल यांच्या मते 'कोरव' या शब्दाचा अर्थ मनुष्य असा आहे व कोरव शब्दावरूनच कोरकू ही संज्ञा प्रचलित झाली असावी. तथापि काही अभ्यासकांच्या मते 'मूडा' या आदिवासी जमातीचा एक उपभाग म्हणजे कोरकू जमात होय .वस्ती जंगली आणि पहाडी भागात वसलेली आहे. प्राथमिक स्वरूपाच्या सोईसवलतीही आदिवासींना मिळत नाही. भारताच्या स्वातंत्र्याचा सूर्य उगवून ६८ वर्षापेक्षा अधिक होऊनही मेळघाटातील अनेक गावात रस्ते, वीज, शैक्षणिक, आरोग्य विषयक सुविधांचा अभाव दिसून येतो.

आदिवासीच्या समस्या ही काही मेळघाटातील समस्या नाही. तर ती राष्ट्रीय समस्या आहे असे समजून त्यावर उपाययोजना केली पाहीजे तरच दऱ्याखोऱ्यात दुर्गम भागात घनदाट जंगलात राहणाऱ्या आदिवासींना काही तरी न्याय आपण देऊ शकू. 'आज आपल्या देशामध्ये आधिक विषमतेची दरी झपाट्याने वाढत आहे. आजही मेळघाटातील भूक आम्ही भागवू शकलेलो नाहीत, हे वास्तव स्वीकारायला हवे. आजही तिथे कित्येक कुपोषित बालके जन्म घेतात. जगतात व मरतात. अर्जुन सेन गुप्ता समितीने सरकारकडे सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे की, देशातील ७०% लोकांना दारिद्र्याचे जीवन जगावे लागते. ते दिवसाला केवळ २० रूपये कमावतात. ८० कोटी जनतेला दोन वेळेच्या अन्नासाठी संघर्ष करावा लागतो. तरोहों मायबाप सरकार त्यांच्यासाठी योजना निर्धारित करण्यापलीकडे काही करू शकत नाही."

**मेळघाटातील आदिवासीची सामाजिक स्थिती :**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्र सातपुडा पर्वतातील जंगल व्याप्त व दुर्गम क्षेत्र झणून ओळखले जाते. आदिवासी मागास क्षेत्र म्हणून विविध समस्यांनी मेळघाट ग्रस्त आहे. 'अमरावती जिल्ह्याच्या उत्तरेस सातपुडा पर्वत पूर्व-पश्चिम पसरलेला असून सातपुड्याच्या कुशीत धारणी आणि चिखलदरा हे दोन आदिवासी बहूल तालुके वसलेली आहे. ह्याच दुर्गम अशा परिसरात गोंड, कोरकू, कोलाम, परिधान, आंध इत्यादी आदिवासी लोक राहतात." २००१ च्या

जणगणनेनुसार मेळघाट आदिवासी परिक्षेत्राची लोकसंख्या २,४२,६४७ असून त्यामध्ये १,८३,२३५ आदिवासींचे प्रमाण गैर आदिवासींच्या तुलनेत अधिक दिसून येते. म्हणून राष्ट्रपतीच्या घोषणेनुसार मेळघाटाला अनुसूचित क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. मेळघाटातील आदिवासी जमातीच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेतला तर मेळघाटातील आदिवासी हा भोळाभाबळा, प्रामाणिक, निरक्षर, अबोल, जीवनाचा स्वच्छंदतेने आनंद लुटणारा, देववादी, जंगल, दऱ्याखोऱ्यात राहणारा, त्यांची साधी राहणीमान, निर्मळ आणि स्वच्छ मन, आत्मीयता व सचोटी हे गुण वाखणण्याजोगे आहेत. जीवनाकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टीकोण त्यांच्याजवळ आहे. जल, जमीन आणि जंगल ह्यांना सर्वकाही मानणारा मेळघाटातील आदिवासी अशिक्षीत जरी असला तरी नैतिकदृष्ट्या तो प्रमाणिक आहे. त्यांच्या आदर्श सांस्कृतिक, सामाजिक मुल्ये जपण्याचे काम मेळघाटातील आदिवासी सतत करीत असतो.

**निवासस्थान (वस्ती, ढाणा) :**

मेळघाटातील आदिवासींची बहुतांश वस्ती जंगली व पहाडी भागात वसलेली आहे. 'आदिवासीची वस्ती दोन भागात असते एक पहाडी भागात व दुसरी मैदानी भागात. 'मेळघाटाचा आदिवासी आर्थिक बाबतीत दुबळा असला तरी वस्ती आणि घर याबाबत आत्मनिर्भर आहे. तो भूमिहीन असला तरी गृहहिन आढळून येत नाही.' एकाच नात्यातील, गोत्रातील लोक जवळजवळ घर करून राहतात. कोरकू भाषेत वस्तीला 'ढाणा' असे म्हणतात. घर ही प्रत्येक आदिवासीची प्राथमिक गरज आहे. घर उभारणीत त्याला सरकारी, मित्रपरिवार, नातेवाईक किंवा गोत्रातील लोक सहकार्य करतात.' 'मेळघाटातील आदिवासी पाण्याची व्यवस्था व सखल भाग पाहून वसलेले आहे. कारण या भागात पाण्याचे व्यवस्थापन नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई आहे." गावामध्ये साधारणतः ४० ते ५० घर असतात. काही गावात चांगली विटा, सिमेंटची पक्की घरे आहेत. पण ते आर्थिकदृष्ट्या प्रगत आहेत. पण त्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

**राहणीमान व वेशभूषा (पोषाख) :**

मेळघाटातील आदिवासीचे सामाजिक जीवन दर्शवित असताना राहणीमान, वेशभूषेचा अभ्यास करणे अनिवार्य आहे. 'मेळघाटातील आदिवासी लोकांची वेशभूषा आणि राहणीमान ही अतिशय साधी आहे. कामाच्या व्यापामुळे आदिवासी राहणीमानाकडे पाहिजे त्या प्रमाणात लक्ष देत नाही. पुरुषांचा नेहमीचा पोशाख म्हणजे पांढरे धोतर, शर्ट किंवा बंडी होय." सर्वसाधारण कोरकू डोक्याला फटके, मुडासे आणि कमरेला लंगोटी वजा वस्त्र गुंडाळलेला आढळतो. डोक्यावर काही नसणे हे मेळघाटातील आदिवासीसाठी अशुभ मानले जाते. फाटकी विधी का होईना पण ती प्रत्येकाच्या डोक्याला गुंडाळलेली असते. पुरुष शेतीकाम, अंगमेहनतीचे काम करताना उघडाच असतो. आदिवासी लोक आज मोठ्या प्रमाणात प्रगत समाजाच्या संपर्कात आल्यामुळे नव्या पिढीतील मुले किंवा पुरूष पँट, शर्ट घालतात.

पुरुषर्षाप्रमाणेच आदिवासी स्त्रियांचे राहणीमानही अगदी साधे आहे. 'स्त्रिया साड्या, लुगडे नेसतात. साड्याचा पदर उलटा घेतात. साडीची लांबी ५ ते ७ मीटर असते. अनेक स्त्रियां ब्लाऊज सुद्धा घालतात. वयोवृद्ध स्त्री ब्लाऊज घालत नाही. काही म्हाताऱ्या स्त्रिया पातळ घालतात साड्या किंवा पातळ, लाल, हिरवे व निळ्या रंगाचे असते. कारण हे रंग स्त्रीला फार आवडतात." प्रगत समाजाच्या संपर्कात आल्यामुळे आदिवासी लोकांच्या राहणीमानात आणि पोशाखात आज बदल होताना दिसून येतो. आदिवासी नवीन पीढीतील काही मुली जिन्स व टॉप आणि पंजाबी ड्रेस सुद्धा घालतात.

कुटूंब : कुटूंब संस्था ही मानवाचे सामाजिक जीवन प्रगट करणारी अतिप्राचीन संस्था आहे. 'मानवी समाजाची आज लैंगिक प्रवृत्ती, प्रजोत्पादन, वात्सल्य व वंशसंरक्षण, पालणपोषण इत्यादी सहज प्रवृत्तीवर कुटूंब संस्था आधारित आहे." मानवाचे सामाजिकीकरण घडवून आणणारी कुटूंब ही एक महत्त्वपूर्ण संस्था आहे. जन्मापासून तर मृत्युपर्यंतच्या सर्व विधी या संस्थेतच पूर्ण होतात. मेळघाटातील आदिवासी कुटूंबाला मानवी जीवनाचा मुख्य आधार मानतो. पूर्वीच्या काळात मेळघाटातील आदिवासीमध्ये संयुक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. एकाच कुटूंबात आई-

वडील, आजी-आजोबा, भाऊ, सुना, नातवंडे दिसून येत होती. परंतु आज ती लयास गेली असून त्यांच्यात विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आहेत. असे असले तरी ही कुटूंबातला अथवा नात्यातला जीव्हाळा कमी झालेला दिसून येत नाही. मेळघाटातील आदिवासीमध्ये पितृसत्ताक कुटूंब पद्धती अस्तित्वात आहे. असे असले तरी स्त्रियांना कुटूंबामध्ये महत्त्वाचे स्थान दिल्या जाते. मेळघाटातील कोरकू आदिवासी स्त्रियांना विचारल्याशिवाय कोणतेही महत्त्वपूर्ण निर्णय घेत नाही. कोरकू हे कुटूंबाला आपला सर्वात मोठा सामाजिक आधार मानतात.

**जातपंचायत :**मेळघाटातील आदिवासी जमात ही अशिक्षीत व मागासलेली असली तरी नैतिक मूल्यांचा वा नितीनियमांचा जबरदस्त प्रभाव आदिवासी समाजात दिसून येतो. त्यातील 'जातपंचायत' ही नितीनियम व नैतिकमूल्य टिकवून ठेवणारी एक महत्त्वपूर्ण सामाजिक संस्था आहे. डॉ.डी.. एम. मुजूमदार यांच्या मतानुसार 'जगातील अनेक आदिवासीमध्ये मुखिया, न्यायव्यवस्था अस्तित्वात आहे' यालाच जातपंचायत असे म्हटले आहे. जातपंचायतीची प्रथा मेळघाटातील आदिवासीमध्ये फार पूर्वीपासून तर आजतागायत सुरू असल्याची दिसून येते.

'जातपंचायतीमध्ये गावातील प्रमुख, प्रौढ-वृद्ध व्यक्तीचा समावेश होतो. तसेच गावातील पटेल किंवा आडा पटेल हे सामाजिक नेते पचायत बोलविण्याचे काम करतात.त्याचबरोबर गावातील वृद्ध व अनुभवी व्यक्तीचा समावेश जातपंचायतीचे पंच म्हणून केले जाते. जातपंचायतीचा प्रमुख गावातील पटेल असतो. चौधरी पटेल यांना मदत करतो. कोतवाल पटेल आणि चौधरी या दोघांना मदत करत असतो." गावातील वाद आदिवासी लोक गावाबाहेर न्यायालयात किंवा पोलीस स्टेशनमध्ये जावू न देता, आपल्या गावातील वादविवाद आपल्या जातपंचायतीद्वारा गावातच मिटवितात. जातपंचायतीमध्ये भावा-भावातील भांडणे, कुटूंबातील भांडण, पती-पत्नीमधील वाद, घटस्फोट, शेजाऱ्याशी झालेला वाद, शेतीसंबंधीचा वाद, वारसा हक्कासंबंधी वाद, संपत्ती संबंधी भांडणे इत्यादी अनेक प्रकारचे वादविवाद जातपंचायतीमार्फत मिटविण्याचा प्रयत्न करतात. जातपंचायतीमुळे समाजात एकोपा व सामंजस्य निर्माण होवून तंटामुक्त गाव निर्माण होते. आदिवासीच्या जातपंचायतीला डॉ. व्हेरिएट एल्विन ह्यांनी "खऱ्या अर्थी लोकशाही स्वरूपाच्या

संस्था आहेत" असे म्हटले आहे." कारण या सभेमध्ये ग्रामातील सर्व लोक उपस्थित असतात. आवश्यकतेनुसार स्त्रियांनाही बोलविण्यात येते. ऐतिहासिकदृष्ट्या या सभेला सामाजिक आणि धार्मिक पृष्टी प्राप्त होते.

**सण-उत्सव** :मेळघाटातील आदिवासी जमातीमध्ये आधुनिक वा प्रगत समाजासारखे मनोरंजनाच्या साधनाचा अभाव असल्यामुळे बहुसंख्या आदिवासी सण-उत्सवाला एकत्रित येऊन आनंदाने साजरे करतात. सण-उत्सव सामुहिक साजरा करण्यामागचा आदिवासी लोकांचा उद्देश समाजामध्ये सामाजिक ऐक्य निर्माण करून सामाजिक संघटन घडवून आणणे हा आहे. कारण व्यक्तीगत जीवनापेक्षा आदिवासी लोकांना सामुहिक जीवनात अधिक रस आहे. आदिवासी लोक संस्कृतीची देवाणघेवाण, संस्कृती जोपासणे व त्याचा प्रसार करण्याचे काम सण-उत्सवाद्वारे करत असतात.

मेळघाटातील आदिवासी पुढील सण साजरे करतात - भावेसण आखाडी भवई जरोती* पोळा,दसरा ,दिवाळी, तिळसंक्रांत, होळी, पितर, मीलोनी,शीतला, समाप्ती मेळघाटातील आदिवासी समाजामध्ये वरील प्रकारचे सण साजरे केले जाते. परंतु होळी हा त्यांचा मुख्य सण असून तो सण पाच दिवस चालतो. कोरकू जमातीमध्ये होळी या सणाला विशेष महत्त्व आहे. या सणाला स्त्री-पुरुष नाचतात, नाच, गाणे, ढोल, टिमकी, बासरी, झांज इत्यादीचा संगम असतो. यावेळी मद्याचा पूर येतो. होळी या सणाला आदिवासी लोकगीते म्हणतात आणि शहरातील लोकांच्या घरोघरी जाऊन पैसे मागून वर्गणी गोळा करतात. त्याला ते फगवा म्हणतात. दिवाळी हा सण आर्थिकदृष्ट्या प्रगत लोकच साजरे करतात. पोळा हा सण साजरा करतात. बैलांना संपत्ती मानणारा मेळघाटातील आदिवासी हा सण आनंदाने साजरा करतात. आखाडी, भवई, जेरोती, पितर इत्यादी सण आदिवासी आनंदोत्सवाने साजरा करताना दिसून येतो.

**समारोप** : कोरकू लोकांचे जीवन मोठे संघर्षमय आहे. कारण या लोकांचा कोणताही एक विशिष्ट असा व्यवसाय नाही. हे लोक श्रमाची कामे करतात. तसेच डिंक, जंगली वनस्पती, देहाची फुले गोळा करून ठेकेदारांना विकतात. काही लोक शिकार व मासेमारीही कातात. हे लोक शिकारीसाठी

बांबूचे सापळे तयार करतात. पशूपालन व शेती हे व्यवसायही कोरकूमध्ये प्रचलित आहेत. तथापि श्रमाची कामे करण्यावर भर, आर्थिक व्यवसायामध्ये देकेदारांशी संबंध यामुळे यांची आर्थिक स्थिती दयनीय स्वरूपाची आहे. कोरकूमध्ये पंचायत विशेष प्रभावी आहे. प्रत्येक गावात पंचायत असतेच. गावातील बुद्ध व प्रभावशाली लोक हे पंचायतीचे सभासद असतात, पंचायत ही कोरकूंच्या सामाजिक जिवनाचे नियंत्रण करीत असते. स्त्री-पुरुषांमधील अवैध संबंध, घटस्फोट, विवाहातील तडजोड इत्यादा संबंधीचे खटले पंचायतीसमोर येतात. कोरकू जमात ही अत्यंत मागासलेली आहे. अलीकडच्या काळात शासनाच्या काही योजनांमुळे या जमातीच्या समूहामध्ये परिवर्तन होत आहे.

**संदर्भ सूची :**

१.आदिवासी आणि वंचित समाज, योजना मासिक कार्यालय, केंद्रीय सदन, नवी मुंबई, जने. २०१४, पृ. क्र. २९

स्वातंत्र्य दिन विशेषांक, इंडियातील जागतिक महासत्तेचे मृगजळ ! दैनिक देशोन्नती, वर्ष २००३

२. खापर्ड वा. ब., अमरावती शहराचा इतिहास (सचित्र खंड-३), १९३३ ते १९४७, सन २००१, पृ. क्र. १०६५.

३. साळीवकर संजय, कोरकू, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २०१२, पृ. क्र. २२.

४. मेहेंदके य. श्री., समाजशास्त्राची मूलतत्त्वे, मेहेंदके प्रकाशन, पुणे, १९७३, पृ. क्र. ३२०,

५. पाटील अशोक द, कोरकू जन जीवन, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, १९९३, पृ. क्र. १५३.

६. देवगांवकर श. गो., राजकीय मानवशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८, पृ. ५१.